# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 12/01/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 11 कि.मी अंतरावर मौजा भिष्णुर येथे दिनांक 10/01/2021 चे 22.30 वा. ते दिनांक 11/01/2021 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितीन संभाजी बगवे, वय 40 वर्ष, आ.यु.डी.पी. कॉलनी काटोल हा आपले पत्नी, मुलगा सासु व साळी यांचे सह काटोल येथे गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने रात्री दरम्यान सासुचे भिष्णुर येथील घराचे मुख्य दरवाजा फोडुन घराच्या आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने बेडरूम मधील लोखंडी आलमारीचे लॉकर तोडुन त्यामध्ये ठेवलेले नगदी 2,00,000/– रू., सोन्या–चांदीचे दागीने एकुण कि. 46,500/–रू., 3) कॅनान कंपनीचा कॅमेरा कि. 5,000/–रू., 4) 5 घडयाळ कि. 2,000/–रू., 5) सीडी प्लेअर सोनी कि. 2,000/–रू. असा एकुण कि. 2,55,500/–रू. चा माल व तसेच वस्तीतील बालाजी नामदेव कळंबे यांची एमएच–31/एटी–9746 क्रमांकाची होन्डा कंपनीची मोटरसायकल किमंती 2,000/–रू. असा एकुण कि. 2,57,500/–रु. चे मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री मंगेश काळे 838088745 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर हॉटेल राकेश उपहार गृह समोर उमरेड येथे दिनांक 11/01/2021 चे 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रावण लक्ष्मणराव राउत, वय 44 वर्ष, रा. शेडेश्वर ता उमरेड, जि. नागपुर हे श्रीकृष्ण को ऑपरेटिव्ह बॅकेत गहान ठेवलेले एक जुनी सोन्याचे दागिने कि. 1,50,000/–रू. व नगदी 35,000/–रू. ज्यामध्ये 7 बंडल 50 रूपयांचे नोटा असा एकुण कि. 1,85,000/–रू. चा माल त्यांच्या ताब्यातील एमएच–40 /एम–4772 क्रमांकाच्या सुपर स्पेलंडर मोटरसायकलचे कापडी डिक्कीमध्ये ठेवुन नास्ता करण्याकरीता हॉटेल राकेश उपहार गृह समोर उमरेड येथे मोटरसायकल उभी करून गेले होते. त्या दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मोटरसायकलच्या डिक्कीमधुन कि 1,85,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय कुलकर्णी मो. 9423504745 हे करीत आहे.

# रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 12 किमी अंतरावर मौजा मांढळ राजेशाही ढाबा येथे दिनांक 11/01/2021 चे 06.00 वा. ते 06.30 वा. दरम्यान एमच–40/बीएल–2486 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– सचीन धनशाम दुबे, वय 30 वर्ष, रा. पवनी भाईतलाव वार्ड ता. पवनी जि. भंडारा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 30,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण कि. 34,30,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई समाधान पवार पो.स्टे. कुही यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री कावळे 9923196154 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर